बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि २० जानेवारी २०२४

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९/२०२४ भादवि ३२७,३२३,३२४,४२७,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/०१/२०२४ रोजी १५.०० वा चे सुमारास अभिमानश्री नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०१/२०२४ रोजी २३.४७ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | गोविंद बब्रुवान कांबळे,वय-३८ वर्षे,रा- २७/५,निराळे वस्ती मुरारजी पेठ अरविंदधाम पोलीस वसाहत रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.अस्मिता सुरज जाधव २. एकता उमेश वाघमारे,रा-जय मल्हार चौक बुधवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील नमुद ठिकाणी असताना फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादीला फोन करून सांगितले की आपले राहते घरासमोर दोन बायका व एक मुलगा आला आहे ते तुमच्याकडे पैसे मागण्याकरीता आले आहे असे सांगितल्याने फिर्यादी घरी आले असता तेथे आलेले दोन बायकांनी फिर्यादीस शिवीगाळ देण्यास सुरूवात केली व त्यातील एकीने तिच्यासोबत आणलेल्या काठीने फिर्यादीस मारण्यास सुरूवात केली व दुसऱ्या महिलेने तिचे पायातील चप्पल काढून फिर्यादीस मारहाण केली त्यावेळी फिर्यादीने त्यांना तुम्ही कोण असे विचारले असता दोघीनी राहते घरासमोर पडलेले दगड घेवून घरातील किराणा दुकानावर दगड मारून काऊन्टर दरवाजा घरातील खुर्च्या तोडून फोडून नुकसान केले आहे तसेच घरात घुसून फिर्यादीची आई व पत्नीस हाताने मारहाण करून दुकानाचे गल्यातील ठेवलेले ३,५००/- रू पैसे जबरदस्तीने घेवून शिवीगाळ करत निघून गेले आहे म्हणून. तपास:- सपोनि गायकवाड- **९९७००३३८४०** |

## सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०६/२०२४ भादवि ४३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/०१/२०२४ रोजी ००.३० वा ते ०३.०० वा पर्यत फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०१/२०२४ रोजी १८.५९ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिध्देश्वर काशीनाथ मुनगल,वय-२७ वर्षे,रा- १५२,साठे पाटील वस्ती जुना देगाव नाका सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | पवनकुमार हनमंतु म्हेत्रे,वय-३५ वर्षे,रा- साठे पाटील वस्ती जुना देगाव नाका सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १९/०१/२०२४ रोजी ००.३० वा ते ०३.०० वा च्या दरम्यान घरातील लाईट गेल्याने फिर्यादी व त्याचा भाऊ जागे झाले व घराचे खिडकीतून बाहेर पाहिले असता आग व धूर येत असल्याचे दिसल्याने ते बाहेर येवून पाहिले त्यावेळी फिर्यादीची मो.सायकल क्र एमएच १३ डीएच ३२७९ ही जळत असताना दिसली व त्यामुळे घराचे मिटरला आग लागली त्यावेळी नमुद आरोपी हा दिसला तो फिर्यादीस बघुन तुमची गाडी मी जाळलो तुम्हाला काय करायचे ते करा असे ओरडत अंधाराचा फायदा घेवून पळून गेला आहे सदर आगीत मो.सायकलचे ३०,०००/- रूचे व इलेक्ट्रीक मिटरचे १,०००/- रू चे नुकसान केले आहे. म्हणून. तपास:- पोह/१७१/वाल्मिकी-८८८८५५५१५५ |